रजिस्ट्री सं. डी. 221

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

सत्यमेव जयते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

सं. 1] नई दिल्ली, 23 जनवरी 2003/3 माघ (शके) 1924 [खण्ड 12
No. 1] NEW DELHI, 23RD JANUARY 2003/3 MAGHA (SAKA) 1924 [Vol. 12
अंक १] नवी दिल्ली, २३ जानेवारी २००३/३ माघ (शके) १९२४ [खंड १२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली, दिनांक 23 जनवरी 2003/3 माघ (शके) 1924

(1) दि टॅक्सेशन लॉज (एक्स्टेन्शन टू जम्मू अ‍ॅण्ड कश्मीर) अ‍ॅक्ट, 1954, (2) दि स्पाइसेस, अ‍ॅक्ट, 1986, (3) दि कमिशन ऑफ सती (प्रिव्हेन्शन) अ‍ॅक्ट, 1987, (4) दि जजेस (प्रोटेक्शन) अ‍ॅक्ट, 1985, (5) दि इलेक्शन कमिशन (कंडिशन्स ऑफ इलेक्शन कमिशनर्स अ‍ॅण्ड ट्रॅन्झॅक्शन ऑफ बिझ्नेस) अ‍ॅक्ट, 1991, (6) दि आर्मड फोर्सेस (जम्मू अ‍ॅण्ड कश्मीर) स्पेशल पॉवर अ‍ॅक्ट, 1990, (7) दि अ‍ॅग्रिकल्चरल अ‍ॅण्ड प्रोसेस फूड प्रॉडक्ट्स एक्सपोर्ट सेस अ‍ॅक्ट, 1985, (8) दि ओपिअम अ‍ॅन्ड रेव्हेन्यू लॉज (एक्स्टेन्शन ऑफ अ‍ॅप्लिकेशन) अ‍ॅक्ट, 1950, (9) दि रेव्हेन्यू रिकव्हरी अ‍ॅक्ट, 1890, (10) दि नॅशनल कमिशन फॉर बॅकवर्ड क्लासेस अ‍ॅक्ट, 1993, (11) दि रिसर्च अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट सेस अ‍ॅक्ट, 1986, (12) दि नॅशनल कमिशन फॉर माइनॉरिटिज अ‍ॅक्ट, 1992, (13) दि लॉटरिज (रेग्युलेशन) अ‍ॅक्ट, 1998, (14) दि अ‍ॅग्रिकल्चरल प्रोडयूस सेस अ‍ॅक्ट, 1940, (15) दि बेनामी ट्रॅन्झेक्शन्स (प्रोहिबिशन) अ‍ॅक्ट, 1988, (16) दि पेमेंट ऑफ वेजेस अ‍ॅक्ट, 1936; के मराठी अनुवाद राष्ट्रपति के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रिय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जाएंगे ।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

### (LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, dated 23rd January 2003/ 3 Magha (Saka) 1924

The Translations in Marathi of the (1) The Taxation Laws (Extension to Jammu and Kashmir) Act, 1954, (2) The Spices Cess Act, 1986, (3) The Commission of Sati (Prevention) Act, 1987, (4) The Judges (Protection) Act, 1985, (5) The Election Commission (Conditions of Service of Election Commissioners and Transaction of Business) Act, 1991, (6) The Armed Forces (Jammu and Kashmir) Special Powers Act, 1990, (7) The Agricultural and Processed Foods Products Export Cess Act, 1985, (8) The Opium and Revenue Laws (Extension of Application) Act, 1950, (9) The Revenue Recovery Act, 1890, (10) The National Commission for Backward Classes Act, 1993, (11) The Research and Development Cess Act, 1986, (12) The National Commission for Minorities Act, 1992, (13) The Lotteries (Regulation) Act, 1998, (14) The Agricultural Produce Cess Act, 1940, (15) The Benami Transactions (Prohibition) Act, 1988, (16) The Payment of Wages Act, 1936 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

### (विधायी विभाग)

नवी दिल्ली, दिनांक २३ जानेवारी २००३/३ माघ (शके) १९२४

पुढील अधिनियमांचे म्हणजे (१) दि टॅक्सेशन लॉज (एक्स्टेन्शन टू जम्मू अॅन्ड काश्मीर) अॅक्ट, १९५४, (२) दि स्पाइसेस अॅक्ट, १९८६, (३) दि कमिशन ऑफ सती (प्रिव्हेन्शन) अॅक्ट, १९८७, (४) दि जजेस (प्रोटेक्शन) अॅक्ट, १९८५, (५) दि इलेक्शन कमिशन (कंडिशन ऑफ इलेक्शन कमिशनर्स अॅन्ड ट्रॅन्झॅक्शन ऑफ बिझनेस) अॅक्ट, १९९१, (६) दि आर्मड फोर्सेस (जम्मू अॅन्ड काश्मीर) स्पेशल पॉवर अॅक्ट, १९९०, (७) दि अॅग्रिकल्चरल अॅन्ड प्रोसेस्ड फूड प्रॉडक्टस् एक्सपोर्ट सेस अॅक्ट, १९८५ (८) दि ओपिअम अॅन्ड रेव्हेन्यू लॉज (एक्स्टेन्शन ऑफ अॅप्लिकेशन) अॅक्ट, १९५० (९) दि रेव्हेन्यू रिकव्हरी अॅक्ट, १८९०, (१०) दि नॅशनल कमिशन फॉर बॅकवर्ड क्लासेस अॅक्ट, १९९३, (११) दि रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट सेस अॅक्ट, १९८६, (१२) दि नॅशनल कमिशन फॉर माइनॉरिटिज अॅक्ट, १९९२, (१३) दि लॉटरिज् (रेग्युलेशन) अॅक्ट, १९९८, (१४) दि अॅग्रिकल्चरल प्रोड्यूस सेस अॅक्ट, १९४०, (१५) दि बेनामी ट्रॅन्झॅक्शन्स (प्रोहिबिशन) अॅक्ट, १९८८, (१६) दि पेमेंट ऑफ वेजेस अॅक्ट, १९३६; या अधिनियमांचे मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रसिद्ध करण्यात येत असून प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ (१९७३ चा अधिनियम क्रमांक ५०) याच्या कलम २, खंड (क) अन्वये हे अनुवाद त्या अधिनियमांचे प्राधिकृत पाठ आहेत असे समजले जाईल.

## निर्देशसूची
## INDEX


| अ. क्र. Sr. No. | अधिनियमाचे नाव Name of the Act | पृष्ठ क्रमांक Page No. |
|---|---|---|
| १<br>1 | कराधान विधि (जम्मू व काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९५४ .. ..<br>The Taxation Laws (Extension to Jammu and Kashmir) Act, 1954 | ४ |
| २<br>2 | मसाला पदार्थ उपकर अधिनियम, १९८६ .. .. ..<br>The Spices Cess Act, 1986 | ९ |
| ३<br>3 | सती (प्रतिबंध) अधिनियम, १९८७ .. .. ..<br>The Commission of Sati (Prevention) Act, 1987 | ११ |
| ४<br>4 | न्यायाधीश (संरक्षण) अधिनियम, १९८५ .. .. ..<br>The Judges (Protection) Act, 1985 | १७ |
| ५<br>5 | निवडणूक आयोग (निवडणूक आयुक्तांच्या सेवा शर्ती आणि कामकाज चालवणे) अधिनियम, १९९१ .. .. .. .. ..<br>The Election Commission (Conditions of Service of Election Commissioners and Transaction of Business) Act, 1991 .. | १८ |
| ६<br>6 | सशस्त्रदल (जम्मू आणि काश्मीर) विशेष अधिकार अधिनियम, १९९० ..<br>The Armed Forces (Jammu and Kashmir) Special Powers Act, 1990 | २१ |
| ७<br>7 | कृषि व संस्कारित अन्न पदार्थ निर्यात उपकर अधिनियम, १९८५ .. ..<br>The Agricultural and Processed Food Products Export Cess Act, 1985 | २३ |
| ८<br>8 | अफू व महसूल कायदे (प्रयुक्ति क्षेत्राचे विस्तारण) अधिनियम, १९५० ..<br>The Opium and Revenue Laws (Extension of Application) Act, 1950 | २४ |
| ९<br>9 | महसूल वसुली अधिनियम, १८९० .. .. .. ..<br>The Revenue Recovery Act, 1890 | २८ |
| १०<br>10 | राष्ट्रीय मागासवर्ग आयोग अधिनियम, १९९३ .. .. ..<br>The National Commission for Backward Classes Act, 1993 | ३२ |
| ११<br>11 | संशोधन व विकास उपकर अधिनियम, १९८६ .. .. ..<br>The Research and Development Cess Act, 1986 | ३६ |
| १२<br>12 | राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग अधिनियम, १९९२ .. .. ..<br>The National Commission for Minorities Act, 1992 | ३८ |
| १३<br>13 | लॉटरी (विनियमन) अधिनियम, १९९८ .. .. ..<br>The Lotteries (Regulation) Act, 1998 | ४२ |
| १४<br>14 | कृषि उत्पादन उपकर अधिनियम, १९४० .. .. ..<br>The Agricultural Produce Cess Act, 1940 | ४५ |
| १५<br>15 | बेनामी संव्यवहार (प्रतिषेध) अधिनियम, १९८८ .. .. ..<br>The Benami Transaction (Prohibition) Act, 1988 | ४९ |
| १६<br>16 | वेतन प्रदान अधिनियम, १९३६ .. .. .. ..<br>The Payment of Wages Act, 1936 | ५१ |

# वेतन प्रदान अधिनियम, १९३६

**(सन १९३६ चा अधिनियम क्रमांक ४)**[1]

(३१ जानेवारी २००२ रोजी यथाविद्यमान)

[२३ एप्रिल १९३६]

[2][* * *] कामावर ठेवलेल्या विशिष्ट व्यक्तिवर्गांना करावयाच्या वेतन प्रदानाचे नियमन करण्या-करिता अधिनियम.

ज्याअर्थी, [2][* * *] कामावर ठेवलेल्या विशिष्ट व्यक्तिवर्गांना करावयाच्या वेतन प्रदानाचे नियमन करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, या द्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास "वेतन प्रदान अधिनियम, १९३६" असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.

[3][(२) त्याचा विस्तार [4]* * * संपूर्ण भारतभर आहे.]

(३) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा तारखेस[5] तो अंमलात येईल.

(४) प्रथमतः तो, कोणत्याही [6][कारखान्यात] कामाला असलेल्या व्यक्तींना, रेल्वे प्रशासनाने किंवा रेल्वे प्रशासनाबरोबर केलेले कंत्राट पुरे करणाऱ्या व्यक्तीने प्रत्यक्षपणे किंवा एखाद्या पोट-कंत्राटदारामार्फत कोणत्याही रेल्वेत (कारखाने वगळता इतरत्र) रोजगाराला लावलेल्या [6][व्यक्तींना] [7][आणि कलम २ खंड (दोन), उप-खंड (क) ते (छ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या औद्योगिक किंवा इतर आस्थापनांमध्ये रोज-गाराला लावलेल्या व्यक्तींना] वेतन देण्याच्या बाबतीत लागू होईल.

(५) [6][या अधिनियमाचे] उपबंध किंवा त्यांपैकी कोणतेही उपबंध यांचे विस्तारक्षेत्र वाढवण्याचा आपला उद्देश असल्याबद्दल तीन महिन्यांची नोटीस देऊन नंतर, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ते उपबंध [8][कलम २, खंड (दोन), उपखंड (ज) अन्वये केंद्र सरकारने किंवा राज्य-शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही आस्थापनेत किंवा आस्थापनेच्या वर्गात] कामास असलेल्या कोणत्याही व्यक्तिवर्गास वेतन देण्याबाबत लागू करू शकेल :

[9][परंतु, केंद्र सरकारच्या मालकीच्या अशा कोणत्याही आस्थापनेच्या संबंधात, त्या शासनाची सहमती असल्याखेरीज अशी कोणतीही अधिसूचना काढण्यात येणार नाही.]

(६) ज्या वेतन-कालावधीतील वेतन, दरमहा सरासरी [10][एक हजार सहाशे रुपये] किंवा त्याहून अधिक होत असेल अशा वेतन कालावधीच्या संबंधात प्रदेय असलेल्या वेतनाला या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

२. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,— व्याख्या.

[11][(एक) "रोजगारी व्यक्ती" यात, मयत झालेल्या रोजगारी व्यक्तीच्या वैध प्रतिनिधीचा समावेश होतो ;

(एक-क) "नियोक्ता" यात, मृत नियोक्त्याच्या वैध प्रतिनिधीचा समावेश होतो ;

(एक-ख) "कारखाना" याचा अर्थ, "कारखाना अधिनियम, १९४८" (१९४८ चा ६३), कलम २ खंड (ड) मध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे कारखाना, असा आहे आणि त्यात, त्या अधिनियमाच्या कलम ८५, पोट-कलम (१) अन्वये, ज्या जागेला त्या अधिनियमाचे उपबंध लागू करण्यात आले असतील अशा कोणत्याही जागेचा समावेश होतो ;]

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता, भारताचे राजपत्र, १९३५, भाग पाच, इंग्रजी पृष्ठ २० पहा, निवड समितीच्या अहवालासाठी, त्याच राजपत्राचे इंग्रजी पृष्ठ ७७ पहा.

२. १९८२ चा अधिनियम ३८, कलम २ अन्वये मूळ मजकूर वगळला.

३. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये पोटकलम (२) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. "भाग ख राज्ये खेरीजकरून" या शब्दांऐवजी १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हे शब्द दाखल करण्यात आले होते. जे त्यानंतर १९७० चा अधिनियम ५१, कलम २(२) आणि अनुसूची यांद्वारे वगळले.

५. (कलम १३ खेरीज) १५ ऑक्टोबर १९८२/पहा. भारताचे सर्वसाधारण राजपत्र, भाग दोन, उप-विभाग ३ (एक), अधिसूचना जी. एस. आर. ६१२ (ई), दिनांक १५ ऑक्टोबर १९८२ आणि कलम १३, १ मार्च, १९९४ रोजी व तेव्हापासून अंमलात येईल. पहा जी. एस. आर. २८७ (ई), दिनांक १ मार्च १९९४.

६. १९८२ चा अधिनियम ३८, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केला.

७. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे समाविष्ट केले.

८. १९५७ चा अधिनियम ६८, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ एप्रिल १९५८ रोजी व तेव्हापासून).

९. १९८२ चा अधिनियम ३८, कलम ३ द्वारे मूळ परंतुकाऐवजी दाखल केले.

१०. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

११. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ३ द्वारे खंड (एक) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

(दोन) [1][ "औद्योगिक व इतर आस्थापना" याचा अर्थ, ] पुढीलप्रमाणे आहे :—

[2][ (क) भाडे किंवा मोबदला घेऊन उतारूंची किंवा मालाची किंवा या दोहोंची सडकेने ने-आण करणारी कोणतीही ट्राम सेवा किंवा मोटार परिवहन सेवा ;

(कक) संघराज्याची भूसेना, नौसेना किंवा वायुसेना यांच्या अथवा भारत सरकारच्या मुलकी विमानचालन विभागाच्या मालकीची किंवा फक्त तेथेच-चालवली जाणारी हवाई परिवहन सेवा सोडून अन्य अशी हवाई परिवहन सेवा ; ]

(ख) गोदी, मालधक्का किंवा ढकशी ;

[3][ (ग) यंत्रचालित अंतर्देशीय जलयान ; ]

(घ) खाण, दगडखाण किंवा तेलक्षेत्र ;

(ङ) मळा ;

(च) वस्तूंचा वापर, परिवहन किंवा विक्री करण्याच्या दृष्टीने जेथे त्याचे उत्पादन करण्यात येते, त्यांच्यात अनुकूल बदल करण्यात येतो किंवा त्या वस्तू तयार करण्यात येतात अशी कार्यशाळा किंवा अन्य आस्थापना ;

[4][ (छ) जेथे इमारती, रस्ते, पूल किंवा कालवे यांचे बांधकाम, विकास व देखभाल यांच्याशी संबंधित अथवा नौकानयन, जलसिंचन, किंवा पाणीपुरवठा यांच्याशी संलग्न असलेल्या कार्यांशी संबंधित अथवा वीज किंवा अन्य कोणत्याही रूपातील शक्ती यांची निर्मिती, पारेषण व वितरण यांच्याशी संबंधित असे कोणतेही काम करण्यात येते अशी कोणतीही आस्थापना ; ]

[5][ (ज) केंद्र सरकार किंवा राज्य शासन, त्याचे स्वरूप लक्षात घेऊन त्यात रोज-गाराला लावलेल्या व्यक्तींच्या संरक्षणाकरता **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी कोणतीही इतर आस्थापना किंवा आस्थापनांचा वर्ग ; ]

[6][ (दोन-क) "खाण" याला, खाण अधिनियम, १९५२ (१९५२ चा ३५)-कलम २, पोट-कलम (१), खंड (ञ) मध्ये त्यास नेमून दिलेला अर्थ आहे ; ]

[7][ (तीन) "मळा" याला, मळे कामगार अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६९), कलम २, खंड (च) मध्ये त्यास नेमून दिलेला अर्थ आहे ; ]

(चार) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(पाच) "रेल्वे प्रशासन" याला, "भारतीय रेल्वे अधिनियम, १८९०" (१८९० चा ९), कलम ३, खंड (६) मध्ये त्यास नेमून दिलेला अर्थ आहे; आणि

[8][ (सहा) "वेतन" याचा अर्थ, पैशाच्या रुपात व्यक्त केलेले किंवा तसे व्यक्त करता येण्या-सारखे, एखाद्या रोजगारी व्यक्तीस, तिच्या रोजगाराच्या किंवा अशा रोजगारातील तिच्या कामाच्या संबंधात व्यक्त किंवा गर्भित अटी पूर्ण झाल्यास, प्रदेय होऊ शकेल असे सर्व पारिश्रमिक (मग ते पगार, भत्ते या रूपात असो किंवा अन्य प्रकारे असो) असा आहे, आणि त्यात पुढील रकमांचा समावेश होतो :—

(क) पक्षकारांमधील कोणत्याही लवाद निवाड्यान्वये किंवा समझोत्यांन्वये किंवा न्यायालयाच्या आदेशान्वये प्रदेय असलेले कोणतेही पारिश्रमिक ;

(ख) रोजगारी व्यक्तीस, जादा वेळ केलेल्या कामाबद्दल किंवा सुट्या किंवा कोण-ताही रजेचा कालावधी याबद्दल जे मिळण्याचा हक्क असेल असे कोणतेही पारिश्रमिक ;

(ग) रोजगाराच्या अटीन्वये प्रदेय असलेले कोणतेही जादा पारिश्रमिक (मग ते बोनस म्हणून किंवा इतर कोणत्याही नावाने ओळखण्यात येवो);

---

१. १९८२ चा अधिनियम ३८, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

२. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ३ द्वारे उप-खंड (क) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. १९५७ चा अधिनियम ६८, कलम ३ द्वारे उप-खंड (ग) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ एप्रिल १९५८ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आला (१ एप्रिल १९५८ रोजी व तेव्हापासून).

५. १९८२ चा अधिनियम ३८, कलम ४ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

६. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे, खंड (तीन) ऐवजी दाखल करण्यात आले (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

८. १९५७ चा अधिनियम ६८, कलम ३ द्वारे खंड (सहा) ऐवजी दाखल केले (१ एप्रिल १९५८ रोजी व तेव्हापासून).

(घ) रोजगारी व्यक्तीचा रोजगार संपला की अमुक एक रक्कम, वजाती करून किंवा न करता तिला द्यावी अशी ज्यामध्ये तरतूद केलेली आहे, पण किती मुदतीत प्रदान करण्यात यावे त्यासंबंधी ज्यामध्ये तरतूद केलेली नाही असा कोणताही कायदा, कंत्राट किंवा संलेख या अन्वये रोजगारी व्यक्तीला याप्रमाणे प्रदेय असेल अशी कोणतीही रक्कम ;

(ङ) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये आखण्यात आलेल्या कोणत्याही योजनेखाली रोजगारी व्यक्ती ज्या रकमेला हक्कदार असेल अशी कोणतीही रक्कम ;

पण यात पुढील रकमांचा समावेश होत नाही :—

(१) रोजगाराच्या अटींन्वये प्रदेय असणाऱ्या पारिश्रमिकाचा भाग नसेल असा अथवा पक्षकारांमध्ये झालेल्या कोणत्याही लवाद निवाड्यान्वये किंवा समझोत्यान्वये किंवा न्यायालयाच्या आदेशान्वये प्रदेय नसेल असा कोणताही बोनस (मग तो नफ्यातील हिस्सेदारी योजनेखाली असो किंवा अन्य प्रकारचा असो);

(२) कोणतीही निवासस्थानाची सोय किंवा वीजपुरवठा, पाणीपुरवठा, वैद्यकीय उपचार किंवा इतर सुखसोयी यांचे मूल्य किंवा राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेतनाच्या संगणनेतून वगळलेल्या कोणत्याही सेवेचे मूल्य ;

(३) नियोक्त्याने कोणत्याही निवृत्तिवेतनात किंवा भविष्य निधीमध्ये भरलेले कोणतेही अंशदान व त्यावर उपार्जित झालेले व्याज ;

(४) कोणताही प्रवासभत्ता किंवा कोणत्याही प्रवास सवलतीचे मूल्य ;

(५) या रोजगाराच्या स्वरूपामुळे रोजगारी व्यक्तीला करावा लागणारा विशेष खर्च भागविण्याकरिता तिला देण्यात आलेली कोणतीही रक्कम ;

(६) उप-खंड (घ) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रकरणांखेरीज इतर बाबतीत रोजगार समाप्त झाल्यावर प्रदेय असलेले कोणतेही उपदान].

**वेतन प्रदानाची जबाबदारी.**

३. प्रत्येक नियोक्ता त्याने कामावर ठेवलेल्या व्यक्तींना, या अधिनियमान्वये देणे आवश्यक असलेले सगळे वेतन देण्यास जबाबदार असेल :

परंतु, ज्या व्यक्ती, (कंत्राटदारामार्फत नव्हे तर अन्य प्रकारे),—

(क) कारखान्यांमध्ये रोजगाराला असून, त्यांपैकी एखादी व्यक्ती [1][कारखाना अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३) कलम ७, पोटकलम (१), खंड (च)] याअन्वये त्या कारखान्याची व्यवस्थापक म्हणून नामनिर्दिष्ट करण्यात आली असेल तर;

[2][(ख) औद्योगिक किंवा इतर आस्थापनांमध्ये रोजगाराला असून, त्या त्या औद्योगिक किंवा इतर आस्थापनेचे पर्यवेक्षण व नियंत्रण करण्याबद्दल त्यांपैकी एखादी व्यक्ती नियोक्त्यास जबाबदार असेल तर ;]

(ग) रेल्वेमध्ये (कारखाने वगळता इतरत्र) रोजगाराला असून, रेल्वे प्रशासन हे जर नियोक्ता असेल आणि त्याने एखाद्या व्यक्तीस या बाबतीत संबंधित स्थानिक क्षेत्राकरिता नामनियुक्त केले असेल तर,

अशा बाबतीत, अशा प्रकारे नामनियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, अशा प्रकारे नियोक्त्यास जबाबदार असलेली व्यक्ती, किंवा यथास्थिति, अशाप्रकारे नामनियुक्त करण्यात आलेली व्यक्ती [3][ही देखील अशा प्रदानास जबाबदार असेल].

**वेतन कालावधी निश्चित करणे.**

४. (१) कलम ३ अन्वये वेतन प्रदानास जबाबदार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला, असे वेतन कोणत्या कालावधींच्या संबंधात प्रदेय असेल असे कालावधी (या अधिनियमात "वेतन-कालावधी" म्हणून निर्दिष्ट करण्यात आलेला) ते निश्चित करतील.

(२) कोणताही वेतन-कालावधी एक महिन्याहून अधिक असणार नाही.

---

१. १९५७ चा अधिनियम ६८, कलम ४ द्वारे "कारखाने अधिनियम, १९३४ च्या कलम ९, पोटकलम (१), खंड (ङ)" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (१ एप्रिल १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. १९८२ चा अधिनियम ३८, कलम ५ द्वारे मूळ खंड (ख) ऐवजी दाखल करण्यात आला.

३. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ४ द्वारे "ही अशा प्रदानास जबाबदार असेल" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आले (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

वेतन प्रदानाची वेळ. ५. (१) (क) जेथे एक हजाराहून कमी व्यक्ती रोजगारास असतील अशी कोणतीही रेल्वे, कारखाना किंवा [1][औद्योगिक किंवा इतर आस्थापना] यामध्ये किंवा त्या ठिकाणी रोजगारास असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे वेतन, ज्या वेतन कालावधीबद्दल वेतन प्रदेय असेल त्या कालावधीचा शेवटचा दिवस संपल्यानंतरचा सातवा दिवस संपण्यापूर्वी द्यावे लागेल;

(ख) इतर कोणतीही रेल्वे, कारखाना किंवा [1][औद्योगिक किंवा इतर आस्थापना] यामध्ये किंवा त्या ठिकाणी रोजगारास असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस, ज्या वेतन कालावधीबद्दल वेतन प्रदेय असेल त्या कालावधीचा शेवटचा दिवस संपल्यानंतरचा दहावा दिवस संपण्यापूर्वी द्यावे लागेल:

[2][परंतु, गोदी, मालधक्का किंवा ढकशी किंवा खाण या ठिकाणी रोजगाराला असणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत जहाज किंवा वाघिणी यांमध्ये चढवलेला, किंवा यथास्थिति, त्यांतून उतरवलेल्या मालाच्या टनभाराचा अंतिम हिशेब पूर्ण झाल्यानंतर देय म्हणून शिल्लक असल्याचे आढळलेले वेतन, असा हिशेब पूर्ण झाल्यापासून सातवा दिवस संपण्यापूर्वी द्यावे लागेल.]

(२) जेव्हा नियोक्त्याकडून किंवा त्यांच्या वतीने रोजगार समाप्त करण्यात येईल तेव्हा, त्या व्यक्तीने अर्जित केलेले वेतन, तिचा रोजगार समाप्त करण्यात आला त्या दिवसापासून कामाचा दुसरा दिवस संपण्यापूर्वी द्यावे लागेल :

[3][परंतु, आठवडयाची किंवा इतर मान्यताप्राप्त सुटी खेरीजकरून इतर कोणत्याही कारणाकरिता आस्थापना बंद झाल्यामुळे एखाद्या व्यक्तीचा रोजगार समाप्त करण्यात आला असेल त्या बाबतीत, त्या व्यक्तीने अर्जित केलेले वेतन, तिचा रोजगार अशा प्रकारे समाप्त झाल्याच्या दिवसापासून दुसरा दिवस संपण्यापूर्वी देण्यात येईल.]

(३) कोणत्याही रेल्वेमध्ये (कारखाना वगळून इतरत्र) रोजगाराला असलेल्या व्यक्तींना [4][किंवा केंद्र सरकार किंवा राज्य शासन यांच्या सरकारी बांधकाम खात्यात, रोजंदारी कामगार म्हणून नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींना] वेतन देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीस, अशा कोणत्याही व्यक्तींच्या किंवा अशा व्यक्तिवर्गाच्या वेतनांच्या संबंधात राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मर्यादेपर्यंत आणि अशा शर्तीच्या अधीनतेने या कलमाच्या प्रवर्तनापासून सूट देऊ शकेल :

[5][परंतु, पूर्वोक्तप्रमाणे रोजंदारी कामगार म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीच्या बाबतीत केंद्र सरकारशी विचारविनिमय केला असल्याखेरीज असा कोणताही आदेश देता येणार नाही.].

(४) [6][पोटकलम (२) मध्ये उपबंधित केले असेल ते खेरीजकरून एरव्ही सर्व वेतन प्रदाने] कामाच्या दिवशी करावी लागतील.

वेतनाची रक्कम प्रचलित नाण्यांमध्ये किंवा चलनी नोटांमध्ये द्यावयाची. ६. वेतनाची सर्व रक्कम प्रचलित नाण्यांमध्ये किंवा चलनी नोटांमध्ये किंवा दोन्ही स्वरूपात देण्यात येईल :

[7][परंतु, रोजगारी व्यक्तीचा लेखी प्राधिकार मिळवल्यानंतर, नियोक्ता त्या व्यक्तीस चेकद्वारे किंवा त्या व्यक्तीच्या बँकेतील खात्यात वेतनाची रक्कम जमा करून वेतन देऊ शकेल.].

वेतनामधून कोणत्या वजाती करता येतील. ७. (१) भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० (१८९० चा ९), कलम ४७, पोटकलम (२) याचे उपबंध काहीही असले तरी, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्राधिकृत असलेल्या वजाती खेरीजकरून कोणत्याही प्रकारच्या वजाती न करता रोजगारी व्यक्तीस तिचे वेतन द्यावे लागेल.

[8][**स्पष्टीकरण–एक.**] रोजगारी व्यक्तीने नियोक्त्यास किंवा त्याच्या अभिकर्त्यास केलेले कोणतेही प्रदान म्हणजे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, वेतनातून करण्यात आलेली वजात असल्याचे मानण्यात येईल.

---

१. १९८२ चा अधिनियम ३८, कलम ६ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

२. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ५ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे "सर्व वेतन प्रदाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

७. १९७६ चा अधिनियम २९, कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१२ नोव्हेंबर १९७५ रोजी व तेव्हापासून).

८. १९५७ चा अधिनियम ६८ याच्या कलम ५ द्वारे स्पष्टीकरणास 'स्पष्टीकरण एक' असा नव्याने क्रमांक देण्यात आला (१ एप्रिल १९५८ रोजी व तेव्हापासून).

[1][**स्पष्टीकरण–दोन**.––जर पुढीलपैकी म्हणजे,––

(एक) वेतनवाढ किंवा बढती रोखून धरणे (दक्षतारोधाच्या वेळी वेतनवाढ थांबविणे याचाही यात समावेश होतो);

(दोन) खालच्या पदावर आणणे किंवा समय-श्रेणीवर किंवा समय-श्रेणीतील खालच्या टप्प्यावर आणणे ; किंवा

(तीन) निलंबित करणे,

यांपैकी कोणतीही शिक्षा सबळ व पुरेशा कारणावरून रोजगारी व्यक्तीला दिलेली असून, अशी कोणतीही शिक्षा देण्याकरिता नियोक्त्याने केलेले नियम हे, राज्य शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या बाबतीत विनिर्दिष्ट केल्या असतील अशा कोणत्याही आवश्यकतांनुरूप असतील तर अशा कोणत्याही बाबतीत, त्या शिक्षेमुळे होणारी वेतनहानी ही वेतनातील वजात असल्याचे मानण्यात येणार नाही.].

(२) रोजगारी व्यक्तीच्या वेतनातून या अधिनियमाच्या उपबंधांनुसारच केवळ वजाती करण्यात येतील, आणि त्या पुढील प्रकारच्या असू शकतील :––

(क) द्रव्यदंड ;

(ख) कामावर गैरहजर राहिल्याबद्दल करावयाच्या वजाती ;

(ग) रोजगारी व्यक्तीकडे सांभाळून ठेवण्यासाठी सोपवण्यात आलेल्या मालाचे झालेले नुकसान किंवा हानी अथवा ज्याचा हिशेब त्याने द्यावयाचा आहे अशा पैशाची झालेली हानी याचा कारणसंबंध सरळसरळ तिने केलेल्या हयगयीशी किंवा कसुरीशी जोडता येण्यासारखा असेल तेव्हा, अशा नुकसानाबद्दल किंवा हानीबद्दल करावयाच्या वजाती ;

[2][(घ) नियोक्त्याने किंवा शासनाने किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये स्थापण्यात आलेल्या कोणत्याही गृहनिर्माण मंडळाने (मग ते शासन किंवा मंडळ हे नियोक्ता असो वा नसो) किंवा राज्य शासनाकडून **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा, राहण्यासाठी घरे उपलब्ध करून देण्याच्या कामी अर्थ-सहाय्य देण्याचा व्यवसाय करणाऱ्या अन्य कोणत्याही प्राधिकरणाने राहण्यासाठी घरे उपलब्ध करून दिल्याबद्दल करावयाच्या वजाती ;]

(ङ) [3] * * * राज्य शासन [4][किंवा याबाबतीत त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल असा कोणताही अधिकारी] याने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या असतील अशा ज्या सोयी व सेवा नियोक्त्याने पुरवल्या असतील त्याबद्दल करावयाच्या वजाती;

**स्पष्टीकरण**.––[5][या खंडातील] "सेवा" या शब्दात, कामधंद्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या हत्यारांचा व कच्च्या सामग्रीचा पुरवठा करणे हे समाविष्ट नाही ;

[6][(च) कोणत्याही स्वरूपाची अग्रिमे (प्रवास भत्ता किंवा वाहन भत्ता यांच्या अग्रिमासह) आणि त्या संबंधात देय असलेले व्याज यांच्या वसुलीपोटी किंवा जादा दिल्या गेलेल्या वेतनाच्या समायोजनापोटी करावयाच्या वजाती ;

(चच) राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नियमांनुसार कामगारांच्या कल्याणाकरिता स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही निधीमधून देण्यात आलेली कर्जे आणि त्यासंबंधात देय असलेले व्याज यांच्या वसुलीपोटी करावयाच्या वजाती ;

(चचच) घरबांधणीकरिता किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या अन्य प्रयोजनांकरिता देण्यात आलेली कर्जे आणि त्यासंबंधात देय असलेले व्याज यांच्या वसुलीपोटी करावयाच्या वजाती; ]

(छ) रोजगारी व्यक्तीकडून प्रदेय असलेल्या प्राप्तिकराच्या वजाती ;

(ज) न्यायालयाच्या आदेशावरून किंवा असा आदेश देण्यास सक्षम असणाऱ्या अन्य प्राधि-करणाच्या आदेशावरून कराव्या लागणाऱ्या वजाती ;

---

१. १९५७ चा अधिनियम ६८ याच्या कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ एप्रिल १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे खंड (घ) ऐवजी दाखल करण्यात आले (१ एप्रिल १९५८ रोजी व तेव्हापासून).

३. भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे, "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल किंवा" हे शब्द वगळण्यात आले.

४. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

५. १९७४ चा अधिनियम ५६, कलम ३ आणि अनुसूची दोन याद्वारे "या उपखंडातील" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

६. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ६ द्वारे खंड (च) ऐवजी दाखल करण्यात आले (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

(झ) ज्याला "भविष्य निधि अधिनियम, १९२५" (१९२५ चा १९) लागू होतो अशा कोणत्याही भविष्य निधीत किंवा "भारतीय प्राप्तिकर अधिनियम, १९२२" (१९२२ चा ११) कलम ५८क मध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे कोणत्याही मान्यताप्राप्त भविष्य निधीत किंवा राज्य शासनाने याबाबतीत मान्यता दिलेल्या कोणत्याही भविष्य निधीत, अशी मान्यता चालू असतानाच्या काळात वर्गण्या भरण्याकरता किंवा त्या निधीतून घेतलेल्या अग्रिमांच्या परतफेडीकरता करावयाच्या वजाती; [1] * * *

[2] * * * * * * * * *

(ञ) राज्य शासन [3][किंवा याबाबतीत त्याच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेला कोणताही अधिकारी] याने मान्यता दिलेल्या कोणत्याही सहकारी सोसायटयांकडे किंवा भारतीय डाक कार्यालयाने चालवलेल्या एखाद्या विमा योजनेपोटी भरणा करण्यासाठी करावयाच्या वजाती; [4][आणि]

[4][[5][(ट) आयुर्विमा महामंडळ अधिनियम, १९५६ (१९५६ चा ३१) याअन्वये स्थापण्यात आलेल्या भारतीय आयुर्विमा महामंडळास रोजगारी व्यक्तीच्या आयुर्विमा पत्राचा कोणताही हप्ता भरण्याकरिता अथवा भारत सरकारचे किंवा कोणत्याही राज्य शासनाचे रोखे खरेदी करण्याकरिता अथवा अशा कोणत्याही शासनाच्या कोणत्याही बचत योजनेच्या पुरस्सरणार्थ कोणत्याही डाकघर बचत बँकेमध्ये जमा करण्याकरिता त्या व्यक्तीच्या लेखी प्राधिकारान्वये करावयाच्या वजाती; ]]

[6][(टट) नियोक्त्याद्वारे स्थापन केलेल्या किंवा रोजगाराला लावलेल्या व्यक्तींच्या किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या किंवा दोघांच्याही कल्याणाकरिता "व्यवसाय संघ अधिनियम १९२६" (१९२६ चा १६) अन्वये नोंदणी केलेल्या आणि राज्य शासन किंवा याबाबतीत त्याने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या, व्यवसाय संघाच्या कोणत्याही निधीमध्ये, अशी मान्यता चालू असताना, त्याच्या अंशदानाचे प्रदान करण्याकरिता त्या व्यक्तीच्या लेखी प्राधिकारान्वये करावयाच्या वजाती;

(टटट) "व्यवसाय संघ अधिनियम, १९२६" (१९२६ चा १६) अन्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही व्यवसाय संघाच्या सदस्यत्वाकरिता त्याच्याद्वारे देय असलेल्या फीच्या प्रदानाकरिता त्या व्यक्तीच्या लेखी प्राधिकारान्वये करावयाच्या वजाती; ]

[7][(ठ) इमानदारी हमी बंधपत्रांवरील विमा हप्ते भरण्याकरिता करावयाच्या वजाती;

(ड) रोजगारी व्यक्तीने नकली किंवा हिणकस नाणी अथवा फाटक्यातुटक्या किंवा बनावट चलनी नोटा स्वीकारल्यामुळे रेल्वे प्रशासनास सोसावा लागलेला तोटा भरून काढण्यासाठी करावयाच्या वजाती;

(ढ) एखाद्या रेल्वे प्रशासनाला येणे असलेल्या योग्य आकारांबाबत बीजके बनविणे, बिले बनविणे, ती वसूल करणे किंवा त्यांचा हिशेब देणे याकामी रोजगारी व्यक्तीकडून कसूर झाल्यामुळे त्या प्रशासनाला सोसावा लागलेला तोटा भरून काढण्यासाठी करावयाच्या वजाती; मग तो तोटा प्रवासभाडे, वाहणावळ, विलंब-आकार, धक्काभाडे व यारीभाडे यांच्या संबंधात असो किंवा खानपानसेवेमार्फत होणाऱ्या खाद्यपदार्थांच्या विक्रीच्या संबंधात असो किंवा धान्य दुकानांमधून किंवा अन्यथा होणाऱ्या जिन्नस विक्रीच्या संबंधात असो;

(ण) रोजगारी व्यक्तीने चुकीने मंजूर केलेले वटाव किंवा परतावे यांमुळे रेल्वे प्रशासनाला तोटा आलेला असून, अशा तोटयाचा कारणसंबंध सरळसरळ रोजगारी व्यक्तीने केलेल्या हयगयीशी किंवा कसुरीशी जोडता येण्यासारखा असेल त्या बाबतीत, असा तोटा भरून काढण्यासाठी करावयाच्या वजाती; ]

---

१. १९४० चा अध्यादेश ३, कलम २ द्वारे "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

२. भारत संरक्षण अधिनियम, १९७१ (१९७१ चा ४२) हा अंमलात असेपर्यंत कलम ७ हे, जणू काही त्याच्या पोटकलम (२), खंड (झ) नंतर पुढील खंड समाविष्ट केला असल्याप्रमाणे अंमलात राहील :—

"(झझ) (एक) रोजगारी व्यक्तीच्या, किंवा

(दोन) राष्ट्रीय संरक्षण निधि किंवा राज्य शासनाने मान्य केलेली इतर कोणतीही संरक्षण बचत योजना यास, विहित करण्यात येईल अशा शर्तींस अधीन राहून अंशदान देण्यासाठी रोजगारी व्यक्ती ज्याची सदस्य आहे अशा नोंदणीकृत संघटनेचा अध्यक्ष किंवा कार्यवाह यांच्या लेखी प्राधिकाराने केलेल्या वजाती;".

३. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

४. १९४० चा अध्यादेश ३, कलम २ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

५. १९५७ चा अधिनियम ६८, कलम ५ अन्वये खंड (ट) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (१ एप्रिल १९५८ रोजी व तेव्हापासून).

६. १९८२ चा अधिनियम ३८, कलम ७ द्वारे दाखल केले.

७. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

[1][(त) प्रधान मंत्र्यांच्या राष्ट्रीय सहाय्य निधीला किंवा केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य निधीला अंशदान करण्यासाठी रोजगारी व्यक्तीच्या लेखी प्राधिकारान्वये करावयाच्या वजाती; ]

[2][(थ) केंद्र सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांच्या फायद्यासाठी आखलेल्या एखाद्या विमा योजनेत अंशदाने करण्यासाठी करावयाच्या वजाती ; ]

[3][(३) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही वेतन कालावधीत कोणत्याही रोजगारी व्यक्तीच्या वेतनामधून पोट-कलम (२) अन्वये करता येतील अशा वजातींची एकूण रक्कम ही,—

(एक) अशा वजाती पोट-कलम (२) च्या खंड (ञ) अन्वये पूर्णतः किंवा अंशतः सहकारी सोसायट्यांना प्रदाने करण्यासाठी करण्यात आल्या असतील त्याबाबतीत, अशा वेतनाच्या पंच्याहत्तर टक्क्यांहून ; आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत, अशा वेतनाच्या पन्नास टक्क्यांहून, अधिक असता कामा नये:

परंतु, पोट-कलम (२) अन्वये प्राधिकृत असलेल्या वजातींची एकूण रक्कम वेतनाच्या पंचाहत्तर टक्क्यांहून किंवा यथास्थिती, पन्नास टक्क्यांहून अधिक होईल त्याबाबतीत, अशी जादा रक्कम विहित करण्यात येईल अशा रीतीने वसूल करता येईल.

(४) रोजगारी व्यक्तीकडून भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० (१८९० चा ९) खेरीजकरुन त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये येणे असलेली कोणतीही रक्कम, अशा व्यक्तीच्या वेतनामधून किंवा अन्यथा वसूल करण्यास नियोक्त्याला या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होतो, असा तिचा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही. ]

८. (१) राज्य शासनाची किंवा विहित प्राधिकरणाची पूर्वानुमति घेऊन नियोक्त्याने पोट-कलम (२) खालील नोटीशीद्वारे त्या व्यक्तीच्या कृती किंवा अकृती म्हणून विनिर्दिष्ट केल्या असतील अशा कृती व अकृती खेरीजकरून इतर कोणत्याही बाबतीत कोणत्याही रोजगारी व्यक्तीवर कोणताही द्रव्यदंड बसवता येणार नाही. द्रव्यदंड

(२) अशा कृती व अकृती विनिर्दिष्ट करणारी एक नोटीस जेथे रोजगार चालवला जात असेल त्या वास्तुमध्ये अथवा रेल्वेत (कारखाना सोडून इतरत्र) रोजगाराला असणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत विहित जागेवर किंवा जागांवर विहित पद्धतीने प्रदर्शित करावी लागेल.

(३) कोणत्याही रोजगारी व्यक्तीवर, द्रव्यदंडाविरुद्ध कारण दाखवण्याची संधी तिला देण्यात आल्याखेरीज किंवा द्रव्यदंड बसविण्याकरिता विहित करण्यात आली असेल अशी कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज अन्यथा कोणताही द्रव्यदंड बसवता येणार नाही.

(४) कोणत्याही रोजगारी व्यक्तीवर कोणत्याही एका वेतन कालावधीत बसवता येईल त्या द्रव्य-दंडाची एकूण रक्कम ही, त्या वेतनकालावधीच्या संबंधात त्या व्यक्तीस प्रदेय असणाऱ्या वेतनातील [4][तीन टक्के] या प्रमाणापेक्षा अधिक असणार नाही.

(५) पंधरा वर्षे वयाखालील कोणत्याही रोजगारी व्यक्तीवर कोणताही द्रव्यदंड बसवता येणार नाही.

(६) कोणत्याही रोजगारी व्यक्तीवर बसवण्यात आलेला कोणताही द्रव्यदंड तिच्याकडून हप्त्या-हप्त्यांनी वसूल करता येणार नाही किंवा असा द्रव्यदंड बसवण्यात आल्यापासून साठ दिवस संपल्यानंतर वसूल करता येणार नाही.

(७) प्रत्येक द्रव्यदंड हा, ज्या कृतीच्या किंवा अकृतीच्या संबंधात तो बसवण्यात आला ती कृती किंवा अकृती ज्या दिवशी करण्यात आली त्या दिवशी बसवण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(८) सर्व द्रव्यदंड व त्यातून वसूल झालेल्या सर्व रकमा यांची कलम ३ खाली वेतन-प्रदानास जबाबदार असलेल्या व्यक्तीने राखावयाच्या एका नोंदवहीत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यानुसार नोंद ठेवावी लागेल आणि अशा सर्व वसूल रकमांचा विनियोग त्या कारखान्यातील किंवा आस्थापने-मधील रोजगारी व्यक्तींना फायदेशीर अशी जी प्रयोजने विहित प्राधिकरणाकडून मान्य करण्यात येतील अशाच प्रयोजनांकरिता करावा लागेल.

---

१. १९७६ चा अधिनियम २९, कलम ४ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१२ नोव्हेंबर १९७५ रोजी व तेव्हापासून).

२. १९७७ चा अधिनियम १९, कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

४. १९८२ चा अधिनियम ३८, कलम ८ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

**स्पष्टीकरण.**—कोणत्याही रेल्वेत, कारखान्यात किंवा [1][औद्योगिक किंवा इतर आस्थापनेत] किंवा त्या ठिकाणी रोजगाराला असलेल्या व्यक्ती या त्याच व्यवस्थापनाखाली कामास असलेल्या कर्मचारी-वर्गाचा केवळ एक भाग असतील त्याबाबतीत, अशा सर्व वसूल रकमा या संपूर्ण कर्मचारीवर्गाकरिता राखून ठेवण्यात आलेल्या सामाईक निधीमध्ये जमा करता येतील—मात्र विहित प्राधिकरणाकडून मान्य करण्यात येतील अशाच प्रयोजनांकरिता त्या निधीचा विनियोग केला जाईल.

कामावर गैरहजर राहिल्याबद्दलच्या वजाती. ९. (१) एखादी रोजगारी व्यक्ती, तिच्या रोजगाराच्या अटींनुसार तिने जेथे काम करणे आवश्यक असेल त्या कामाच्या जागेवर किंवा जागांवर गैरहजर राहिली असून, ही गैरहजेरी तिने काम करणे आवश्यक असलेल्या पूर्ण कालावधीपर्यंत किंवा त्याच्या एखाद्या भागापुरती असेल तर, गैरहजेरीच्या कारणावरून कलम ७, पोट-कलम (२), खंड (ख) अन्वये वजाती करता येतील.

(२) अशा वजातीच्या रकमेचे, ज्याच्या संबंधात वजात करण्यात आली त्या वेतन कालावधीबाबत रोजगारी व्यक्तीला प्रदेय असलेल्या वेतनाशी असावयाचे प्रमाण हे जितक्या कालावधीत ती व्यक्ती गैरहजर होती तितक्या कालावधीचे, त्या व्यक्तीच्या रोजगाराच्या अटींनुसार अशा वेतन कालावधीपैकी जितका काळ तिने काम करणे आवश्यक होते तितक्या एकूण कालावधीशी असलेल्या प्रमाणापेक्षा केव्हाही अधिक असता कामा नये :

परंतु, याबाबतीत राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, जर दहा किंवा त्यांहून अधिक रोजगारी व्यक्ती, नोटीस न देता (म्हणजे त्यांच्या रोजगार-संविदेच्या अटींनुसार आवश्यक असेल अशी नोटीस न देता) व वाजवी कारणाशिवाय एकविचाराने गैरहजर राहिल्या तर, अशा कोणत्याही व्यक्तीच्या वेतनामधून करावयाच्या वजातीमध्ये, योग्य नोटिशीच्या अभावी अशा कोणत्याही अटींनुसार नियोक्त्यास देय होईल अशा, त्या व्यक्तीच्या आठ दिवसांच्या वेतनाच्या रकमेपेक्षा अधिक नाही इतक्या रकमेचा समावेश असू शकेल.

[2][**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, कोणतीही रोजगारी व्यक्ती तिने जेथे काम करणे आवश्यक आहे त्या जागेवर उपस्थित असली तरी, बैठा संप करून किंवा त्या परिस्थितीत गैरवाजवी असलेल्या अन्य कोणत्याही कारणावरून तिने आपले काम करण्याचे नाकारले तर, ती व्यक्ती अशा जागी गैरहजर असल्याचे मानण्यात येईल.]

नुकसान किंवा हानी याबद्दल वजाती. १०. [3][(१) कलम ७, पोट-कलम (२) याच्या खंड (ग) किंवा खंड (ण) खाली केलेली वजात, रोजगारी व्यक्तीच्या हयगयीमुळे किंवा कसुरीमुळे नियोक्त्याच्या झालेल्या नुकसानाच्या किंवा हानीच्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये.

(१क) कलम ७, पोट-कलम (२) याचा खंड (ग) किंवा खंड (ड) किंवा खंड (ढ) किंवा खंड (ण) याखालील वजात, रोजगारी व्यक्तीस वजातीविरुद्ध कारण दाखवण्याची संधी देण्यात आल्याखेरीज किंवा अशा वजाती करण्याकरिता विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज अन्यथा करता येणार नाही.]

(२) अशा सर्व वजाती व त्यातून वसूल झालेल्या सर्व रकमा यांची कलम ३ अन्वये वेतन-प्रदानास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीने राखावयाच्या एका नोंदवहीत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यानुसार नोंद ठेवावी लागेल.

दिलेल्या सेवांबद्दलच्या वजाती. ११. रोजगारी व्यक्तीने रोजगाराची अट म्हणून किंवा अन्यथा राहत्या घराची सोय किंवा सेवा स्वीकारल्या असल्याखेरीज, तिच्या वेतनामधून कलम ७, पोट-कलम (२) च्या खंड (घ) किंवा खंड (ङ) खालील वजात करता येणार नाही आणि अशी वजात, त्या व्यक्तीला पुरवण्यात आलेल्या राहत्या घराच्या स्वरूपातील सोयीच्या किंवा सेवेच्या मूल्याइतक्या रकमेहून अधिक असणार नाही आणि उक्त खंड (ङ) खाली वजात करावयाची असल्यास, अशी वजात, [4]* * * राज्य शासन नेमून देईल अशा शर्तीच्या अधीन असेल.

अग्रिमांच्या वसुलीबद्दलच्या वजाती. १२. कलम ७, पोट-कलम (२) च्या खंड (च) याखालील वजाती पुढील शर्तींच्या अधीन असतील, त्या शर्ती अशा :—

(क) रोजगार सुरू होण्यापूर्वी देण्यात आलेल्या अग्रिम रकमेची वसुली एखाद्या संपूर्ण वेतन कालावधीच्या संबंधात प्रदान केलेल्या पहिल्या वेतनामधून करावी लागेल, परंतु अशा प्रकारची जी अग्रिमे प्रवास खर्चासाठी दिली असतील त्यांची वसुली करता येणार नाही ;

---

१. १९८२ चा अधिनियम ३८, कलम ८ (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

२. १९३७ चा अधिनियम २२, कलम २ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

३. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ७ द्वारे पोट-कलम (१) ऐवजी हा मजकूर दाखल केला (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

४. भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ याद्वारे "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल" हा मजकूर वगळण्यात आला.

[1][(कक) रोजगार सुरू झाल्यानंतर देण्यात आलेल्या अग्रिम रकमेची वसुली ही राज्य शासन नेमून देईल अशा शर्तींच्या अधीन असेल ;]

(ख) मूळात अर्जित न केलेल्या वेतनाच्या अग्रिमांची वसुली ही, किती मर्यादेपर्यन्त अशी अग्रिमे देता येतील व किती हप्त्यांनी त्यांची वसुली करता येईल, त्याचे नियमन करण्याकरिता राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही नियमांस अधीन असेल.

**१२क.** कलम ७, पोटकलम (२) च्या खंड (चचच) खाली देण्यात आलेल्या कर्जाच्या वसुली-करिता करावयाच्या वजाती या, किती मर्यादेपर्यन्त अशी कर्जे देता येतील त्याचे व त्यांवर प्रदेय असणाऱ्या व्याजाच्या दराने नियमन करण्याकरिता राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही नियमांस अधीन असतील.] [2][कर्जाच्या वसुली-बद्दलच्या वजाती.

**१३.** कलम ७, पोटकलम (२) चा खंड (ञ) [3][व खंड (ट)] याखालील वजाती राज्य शासन नेमून देईल अशा शर्तींस अधीन असतील. सहकारी सोसायट्या व विमा योजना यांच्याकडे भरणा करण्यासाठी करावयाच्या वजाती.

**१३क.** (१) प्रत्येक नियोक्त्याला त्याने रोजगारास ठेवलेल्या व्यक्ती, त्यांनी करावयाचे काम, त्यांना देण्यात येणारे वेतन, त्यांच्या वेतनांमधून करण्यात येणाऱ्या वजाती, त्यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या पोचपावत्या यासंबंधीचा तपशील आणि विहित करण्यात येईल त्यानुसार इतर तपशील देणाऱ्या व तशा विहित नमुन्यातील नोंदवह्या व अभिलेख ठेवावे लागतील. [4][नोंदवह्या व अभिलेख ठेवणे.

(२) या कलमान्वये ठेवणे आवश्यक असेल अशी प्रत्येक नोंदवही व अभिलेख हे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, त्यांमध्ये केलेल्या शेवटच्या नोंदीच्या तारखेनंतर तीन वर्षांच्या कालावधीपर्यंत जपून ठेवावे लागतील.]

**१४.** (१) [5][कारखाने अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३) कलम ८ पोटकलम (१)] अन्वये नियुक्त करण्यात आलेला कारखाने निरीक्षक हा या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, त्याला नेमून देण्यात आलेल्या स्थानिक मर्यादांमधील सर्व कारखान्यांच्या संबंधात निरीक्षक असेल. निरीक्षक.

(२) रेल्वेत (कारखाना वगळून इतरत्र) रोजगारास असलेल्या ज्या व्यक्तींना हा अधिनियम लागू होतो अशा सर्व व्यक्तींच्या संबंधात राज्य शासनास या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता निरीक्षक नियुक्त करता येतील.

(३) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, त्यास योग्य वाटतील अशा अन्य व्यक्ती निरीक्षक म्हणून नियुक्त करता येतील आणि त्यांनी कोणत्या स्थानिक मर्यादांमध्ये व तसेच कोणत्या वर्गातील कारखान्यांच्या व [6][ औद्योगिक किंवा इतर आस्थाप-नांच्या] बाबतीत आपले कार्याधिकार बजवावे लागतील. ते निश्चित करता येईल.

[7][(४) निरीक्षक,—

(क) या अधिनियमाच्या उपबंधांचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचे पालन करण्यात येत आहे किंवा कसे याबद्दल खात्री करून घेण्यासाठी, त्यास योग्य वाटेल अशी तपासणी व चौकशी करू शकेल ;

(ख) या अधिनियमाचे उद्दिष्ट पार पाडण्याच्या प्रयोजनाकरिता, कोणत्याही वाजवी वेळी, कोणतीही रेल्वे, कारखाना किंवा [8][औद्योगिक किंवा इतर आस्थापना] यांच्या कोणत्याही वास्तूमध्ये त्यास योग्य वाटेल असे कोणतेही सहाय्य मिळाल्यास त्यानिशी प्रवेश करू शकेल, तिची पाहणी करू शकेल व झडती घेऊ शकेल;

---

१. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ८ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. १९४० चा अध्यादेश ३, कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

४. १९६४ चा अधिनियम ५३, कलम १० द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून.)

५. १९५७ चा अधिनियम ६८, कलम ६ द्वारे "कारखाना अधिनियम, १९३४, कलम १०, पोटकलम (१)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (१ एप्रिल, १९५८ रोजी व तेव्हापासून).

६. १९८२ चा अधिनियम ३८, कलम ९ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

७. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ११ द्वारे पोटकलम (४) ऐवजी दाखल करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून.)

८. १९८२ चा अधिनियम ३८, कलम ९(ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ग) कोणत्याही रेल्वेत किंवा कोणत्याही कारखान्यात किंवा [1][औद्योगिक किंवा इतर आस्थापनेत] रोजगाराला असणाऱ्या व्यक्तींच्या वेतन-प्रदानावर देखरेख ठेवू शकेल ;

(घ) या अधिनियमानुसार ठेवण्यात आलेली कोणतीही नोंदवही किंवा अभिलेख विहित करण्यात येईल अशा जागी हजर करण्यास लेखी आदेशाद्वारे फर्मावू शकेल आणि या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही व्यक्तीच्या जबान्या जागच्या जागी किंवा अन्यथा घेऊ शकेल ;

(ङ) या अधिनियमाखाली नियोक्त्याने अपराध केलेला आहे असे त्याला स्वतःला सकारण वाटत असेल अशा अपराधाच्या बाबतीत, स्वतःला संबद्ध वाटतील अशा नोंदवह्या किंवा दस्तऐवज किंवा त्यांचे भाग सक्तीने ताब्यात घेऊ शकेल किंवा त्यांच्या नकला काढून घेऊ शकेल ;

(च) विहित करण्यात येतील अशा अन्य शक्ती वापरू शकेल. परंतु, या पोटकलमाखाली कोणत्याही व्यक्तीवर, तिला एखाद्या अपराधात गोवण्याकडे ज्याचा रोख आहे अशा कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्याची किंवा अशी कोणतीही जबानी देण्याची सक्ती करण्यात येणार नाही.

(४क) [2]["फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३" (१९७४ चा २)] यांचे उपबंध हे जसे उक्त अधिनियमाच्या [3][कलम ९४] खाली काढण्यात आलेल्या वॉरंटाच्या प्राधिकारान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही झडतीला किंवा अभिग्रहणाला लागू होतात तसे ते, शक्य होईल तेथवर, या पोटकलमाखालील झडतीला किंवा अभिग्रहणाला लागू होतील.]

(५) प्रत्येक निरीक्षक हा "भारतीय दंड संहिता, १८६०" (१८६० चा ४५) यामध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

[4][निरीक्षकांना द्यावयाच्या सुविधा.

१४क. प्रत्येक नियोक्ता हा या अधिनियमाखाली कोठेही प्रवेश, पाहणी, देखरेख, तपासणी किंवा चौकशी करण्यासाठी निरीक्षकास सर्व वाजवी सुविधा उपलब्ध करून देईल.]

वेतनातील वजातींमुळे किंवा वेतन प्रदानातील विलंबामुळे उद्भवणाऱ्या हक्कमागण्या आणि दुर्भावपूर्वक किंवा त्रास देण्याच्या हेतूने केलेल्या हक्कमागण्या यांबद्दल शास्ती.

१५. (१) राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, [5][औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४) याखाली किंवा औद्योगिक विवादाचे अन्वेषण व मिटवणूक यासंबंधी त्या राज्यात त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही सनतुरूप कायद्याखाली घटित केलेल्या कोणत्याही कामगार न्यायालयाचा किंवा औद्योगिक अधिकरणाचा एखादा पीठासीन अधिकारी किंवा] कोणताही श्रमिक भरपाई आयुक्त किंवा दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश पदाचा किंवा वैतनिक दंडाधिकारी पदाचा अनुभव असणारा अन्य अधिकारी यास एखाद्या विनिर्दिष्ट क्षेत्राकरता, [6][त्या क्षेत्रात रोजगाराला असणाऱ्या किंवा ज्यांना त्या क्षेत्रात वेतन प्रदान करण्यात येते अशा व्यक्तींच्या वेतनातून वजाती केल्यामुळे किंवा वेतन प्रदानातील विलंबामुळे उद्भवणाऱ्या सर्व हक्कमागण्यांची---अशा हक्कमागण्यांना आनुषंगिक असणाऱ्या सर्व बाबींसह---सुनावणी करून त्यावर निर्णय देणारा प्राधिकारी म्हणून नियुक्त करू शकेल :

परंतु, राज्य शासनास तसे करणे आवश्यक वाटेल तेव्हा, त्यास कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्राकरिता एकाहून अधिक प्राधिकारी नियुक्त करता येतील आणि त्यांनी या अधिनियमाखाली पार पाडावयाच्या कामाचे वितरण किंवा वाटप यासंबंधी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे तरतूद करता येईल.]

(२) या अधिनियमाच्या उपबंधांविरुद्ध एखाद्या रोजगारी व्यक्तीच्या वेतनामधून वजात करण्यात आलेली असेल किंवा कोणत्याही वेतन प्रदानास विलंब लागलेला असेल त्या बाबतीत, खुद्द अशा व्यक्तीस किंवा त्या व्यक्तीच्या वतीने काम चालवण्यास ज्याला लेखी प्राधिकृत करण्यात आले आहे असा कोणताही विधिव्यवसायी किंवा अशा एखाद्या नोंदलेल्या व्यवसायसंघाचा कोणताही पदाधिकारी यास, किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही निरीक्षकास किंवा पोटकलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या प्राधिकाऱ्याच्या परवानगीने काम चालवणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीस, पोटकलम (३) खाली निदेशासाठी अशा प्राधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल :

---

१. १९६४ चा अधिनियम ५३, कलम ११ द्वारे पोटकलम (४) ऐवजी दाखल करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. १९८२ चा अधिनियम ३८, कलम ९ (ग) (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ९ (ग) (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

४. १९६४ चा अधिनियम ५३, कलम १२ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

परंतु, असा प्रत्येक अर्ज, ज्या तारखेस वेतनातून वजात करण्यात आली त्या तारखेपासून किंवा यथास्थिती ज्या तारखेस वेतन देय होते त्या तारखेपासून [१][बारा महिन्यांच्या] आत सादर करावा लागेल :

परंतु आणखी असे की, अशा मुदतीत अर्ज सादर न करण्यास त्यास पुरेसे कारण होते याबद्दल अर्जदाराने प्राधिकरणाची खात्री पटवून दिल्यास, असा कोणताही अर्ज उक्त [१][बारा महिन्यांच्या] मुदती-नंतरही स्वीकारला जाऊ शकेल.

(३) पोटकलम (२) खाली एखादा अर्ज विचारार्थ स्वीकारला जाईल तेव्हा, प्राधिकारी अर्जदाराचे व नियोक्त्याचे किंवा कलम ३ अन्वये वेतन प्रदानास जबाबदार असणाऱ्या अन्य व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेईल किंवा त्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल, आणि आणखी जी कोणतीही चौकशी आवश्यक (असल्यास) असेल ती केल्यानंतर ते, असा नियोक्ता किंवा अन्य व्यक्ती ही या अधिनियमाखाली ज्या अन्य एखाद्या शिक्षेस पात्र असेल तिला बाध न येता, असा निर्देश देऊ शकेल की, रोजगारी व्यक्तीला तिच्या वेतनामधून वजा करण्यात आलेल्या रकमेचा परतावा करावा किंवा विलंबित वेतनाचे प्रदान करावे आणि सोबत पहिल्या बाबतीत वजात करण्यात आलेल्या रकमेच्या जास्तीत जास्त दसपटीपर्यंत व [२][दुसऱ्या बाबतीत जास्तीत जास्त पंचवीस रुपयांपर्यंत प्राधिकरणास योग्य वाटेल तितकी भरपाई द्यावी, आणि वजात केलेली रक्कम किंवा विलंबित वेतन यांचे प्रदान अर्जाचा निकाल लागण्यापूर्वी करण्यात आले असेल तरीही प्राधिकाऱ्यास योग्य वाटेल अशी जास्तीत जास्त पंचवीस रुपयांपर्यंत भरपाई द्यावी, असे निदेश देऊ शकेल.]

परंतु,—

(क) रोजगारी व्यक्तीला देय असलेल्या रकमेसंबंधी प्रामाणिक चुकभूल झाली म्हणून किंवा खराखुरा तंटा उद्भवला आहे म्हणून ; किंवा

(ख) वेतन-प्रदानास जबाबदार असलेली व्यक्ती, ती वाजवी तत्परता दाखवीत असतानादेखील आकस्मिक प्रसंग उद्भवल्यामुळे किंवा अपवादात्मक परिस्थिती अस्तित्वात असल्यामुळे सत्वर प्रदान करण्यास असमर्थ ठरली होती म्हणून; किंवा

(ग) वेतनाकरिता अर्ज करण्यात किंवा ते स्वीकारण्यात रोजगारी व्यक्तीने कसूर केली म्हणून ;

वेतन-प्रदानास विलंब झाला याबद्दल प्राधिकाऱ्याची खात्री पटल्यास विलंबित वेतनाच्या बाबतीत भरपाई देण्याबाबत कोणताही निदेश देण्यात येणार नाही.

[३][(४) या कलमाखाली अर्जाची सुनावणी करणाऱ्या प्राधिकाऱ्याची जर,—

(क) अर्ज दुर्भावपूर्वक किंवा त्रास देण्याच्या हेतूने करण्यात आला होता अशी खात्री पटली तर, तो प्राधिकारी, अर्ज सादर करणाऱ्या व्यक्तीने नियोक्त्यास किंवा वेतन प्रदानास जबाबदार असणाऱ्या अन्य व्यक्तीस जास्तीत जास्त पन्नास रुपये इतका दंड द्यावा असा निदेश देऊ शकेल; किंवा

(ख) ज्या प्रकरणी पोटकलम (३) अन्वये भरपाई देण्याचा निदेश देण्यात आला आहे अशा कोणत्याही प्रकरणी, अर्जदारास या कलमाखाली भरपाई मागण्याचा प्रसंग यावयास नको होता अशी खात्री पटली तर, तो प्राधिकारी नियोक्त्याने किंवा वेतन प्रदानास जबाबदार असणाऱ्या अन्य व्यक्तीने राज्य शासनास जास्तीत जास्त पन्नास रुपये इतका दंड द्यावा असा निदेश देवू शकेल.

(४क) एखादी किंवा अनेक व्यक्ती ही/या नियोक्त्याची/च्या किंवा रोजगारी व्यक्तीची/च्या वैध प्रतिनिधी आहे/आहेत किंवा कसे याबद्दल कोणताही तंटा निर्माण झाल्यास, अशा तंटयासंबंधी प्राधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल;

(४ख) या कलमाखालील कोणतीही चौकशी ही भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ४५) कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.]

(५) या कलमान्वये जी रक्कम देण्याचा निदेश देण्यात आला असेल अशी कोणतीही रक्कम,—

(क) प्राधिकारी म्हणजे दंडाधिकारी असल्यास, तो जणू काही त्याने दंडाधिकारी म्हणून बसवलेला द्रव्यदंड असावा त्याप्रमाणे वसूल करता येईल; आणि

(ख) प्राधिकारी म्हणजे दंडाधिकारी नसल्यास, प्राधिकारी या बाबतीत ज्याच्याकडे अर्ज करील अशा कोणत्याही दंडाधिकाऱ्याला, जणू काही तो अशा दंडाधिकाऱ्याने बसवलेला द्रव्यदंड असावा त्याप्रमाणे वसूल करता येईल.

---

१. १९६४ चा अधिनियम ५३, कलम १३ द्वारे "सहा महिन्यांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "दुसऱ्या बाबतीत जास्तीत जास्त दहा रुपयांपर्यंत प्राधिकरणास योग्य वाटेल तितकी भरपाई द्यावी असे निदेश ते देऊ शकेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे, पोटकलम (४) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

अप्राप्त वेतन गटाकडून आलेल्या हक्क मागण्या-बाबतीत एकच अर्ज.

१६. (१) जर रोजगारी व्यक्ती या एकाच आस्थापनेवरील असतील आणि [1][या अधिनियमाचे उल्लंघन करून एकाच कारणास्तव व एकाच वेतन कालावधीत किंवा कालावधींमध्ये त्यांच्या वेतनामधून वजाती करण्यात आल्या असतील तर किंवा] स्थायी वेतन कालावधीतील किंवा वेतन कालावधींमधील त्यांचे वेतन, कलम ५ द्वारे निश्चित करण्यात आलेल्या दिवसानंतरही द्यावयाचे राहिले असेल तर, त्या रोजगारी व्यक्ती एकाच अप्राप्तवेतन गटापैकी आहेत असे म्हटले जाते.

(२) एकाच अप्राप्तवेतन गटातील कितीही रोजगारी व्यक्तींच्या वतीने किंवा त्यांच्या बाबतीत कलम १५ अन्वये एकच अर्ज सादर करता येईल आणि अशा बाबतीत [2][ज्या ज्या व्यक्तीच्या वतीने असा अर्ज सादर करण्यात आला असेल अशा प्रत्येक व्यक्तीस, कलम १५ च्या पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत कमाल भरपाई देता येईल.]

(३) एकाच अप्राप्तवेतन गटातील व्यक्तींच्या बाबतीत कलम १५ अन्वये सादर करण्यात आलेले कितीही स्वतंत्र अर्ज प्रलंबित असले तरी, ते सर्व मिळून या कलमाच्या पोटकलम (२) खाली सादर करण्यात आलेला एकच अर्ज आहे असे समजून त्याप्रमाणे प्राधिकाऱ्यास त्यांचा परामर्श घेता येईल व त्या पोटकलमाचे उपबंध तदनुसार लागू होतील.

अपील.

१७. (१) [3][कलम १५ च्या पोटकलम (२) खाली केलेला अर्ज पूर्णतः किंवा अंशतः फेटाळून लावणाऱ्या आदेशाविरुद्ध किंवा त्या कलमाच्या पोटकलम (३) किंवा पोटकलम (४) अन्वये देण्यात आलेल्या निदेशाविरुद्ध] पुढील व्यक्तींना, [4][असा आदेश किंवा निदेश] देण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, इलाखा शहरामध्ये [5] * * * लघुवाद न्यायालयात किंवा अन्यत्र जिल्हा न्यायालयात अपील करता येईल त्या व्यक्ती अशा,—

(क) वेतन व भरपाई म्हणून जी रक्कम देण्याचे निदेशित करण्यात आले आहे ती एकूण रक्कम तीनशे रुपयांपेक्षा अधिक असेल तर [6][किंवा अशा निदेशामुळे परिणामी नियोक्त्यावर किंवा कलम ३ अन्वये वेतन प्रदानास जबाबदार असणाऱ्या अन्य व्यक्तीवर एक हजार रुपयांहून अधिक आर्थिक दायित्व लादले जात असेल तर] नियोक्ता किंवा ती अन्य व्यक्ती; अथवा

[7][(ख) जे वेतन रोखून ठेवण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे त्या वेतनाची एकूण रक्कम रोजगारी व्यक्तीच्या बाबतीत वीस रुपयांहून अधिक असेल तर किंवा रोजगारी व्यक्ती ज्या अप्राप्तवेतन गटापैकी आहे किंवा होती त्या गटाच्या बाबतीत ती एकूण रक्कम पन्नास रुपयांहून अधिक असेल तर, अशी रोजगारी व्यक्ती किंवा त्या रोजगारी व्यक्तीच्या वतीने काम चालवण्यास ज्याला लेखी प्राधिकृत करण्यात आले आहे असा कोणताही विधिव्यवसायी किंवा असा कोणत्याही नोंदलेल्या व्यवसायसंघाचा कोणताही पदाधिकारी किंवा या अधिनियमाखालील कोणताही निरीक्षक किंवा कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये अर्ज करण्यास प्राधिकरणाकडून परवानगी देण्यात आलेली अन्य कोणतीही व्यक्ती; अथवा]

(ग) कलम १५ च्या [8][पोटकलम (४)] अन्वये ज्या व्यक्तीला दंड भरण्याचा निदेश देण्यात आला आहे अशी कोणतीही व्यक्ती,—

[6][(१क) ज्याविरुद्ध अपील करावयाचे आहे त्या निदेशान्वये प्रदेय असलेली रक्कम अपीलकर्त्याने जमा केली आहे अशा अर्थाचे प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अपील अर्जासोबत असल्याखेरीज पोटकलम (१) च्या खंड (क) खाली कोणतेही अपील करता येणार नाही.]

---

१. १९६४ चा अधिनियम ५३, कलम १४ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. १९५७ चा अधिनियम, ६८ कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ एप्रिल, १९५८ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे "आदेश" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आले (१ एप्रिल, १९५८ रोजी व तेव्हापासून).

५. भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे "किंवा रंगूनमध्ये" हा मजकूर वगळण्यात आला.

६. १९६४ चा अधिनियम ५३, कलम १५ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे खंड (ख) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

८. १९३७ चा अधिनियम २०, कलम २ व पहिली अनुसूची द्वारे "पोटकलम (५)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][ (२) पोटकलम (१) मध्ये उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये करण्यात आलेला अर्ज पूर्णतः किंवा अंशतः फेटाळून लावणारा कोणताही आदेश, अथवा त्या कलमाच्या पोटकलम (३) किंवा पोटकलम (४) अन्वये देण्यात आलेला एखादा निदेश अंतिम असेल.]

[2][ (३) एखाद्या नियोक्त्याने या कलमाखाली अपील केले असल्यास ज्याच्या निर्णयाविरुद्ध असे अपील करण्यात आले असेल अशा प्राधिकाऱ्यास त्याच्याकडे जमा करण्यात आलेल्या कोणत्याही रकमेचे प्रदान अपिलाचा निर्णय लागेपर्यंत रोखून ठेवता येईल, आणि पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या न्यायालयाकडून तसा निर्देश देण्यात आल्यास ते प्रदान रोखून ठेवावे लागेल.

(४) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या न्यायालयास, त्यास योग्य वाटले तर, कोणताही विधिविषयक प्रश्न उच्च न्यायालयाकडे निर्णयासाठी सादर करता येईल आणि त्याने तसे केल्यास, ते अशा निर्णयानुरूप त्या प्रश्नाचा निकाल करील.]

[3][नियोक्ता किंवा वेतन प्रदानास जबाबदार असणारी अन्य व्यक्ती याच्या मालमत्तेची सशर्त जप्ती.

**१७क.** (१) कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये अर्ज करण्यात आल्यानंतर कोणत्याही वेळी, प्राधिकाऱ्याची अथवा कलम १७ अन्वये रोजगारी व्यक्तीने किंवा त्या व्यक्तीच्या वतीने काम चालवण्यास ज्याला लेखी प्राधिकृत केलेले आहे अशा कोणत्याही विधि व्यवसायीने किंवा नोंदलेल्या व्यवसाय संघाच्या अशा पदाधिकाऱ्याने किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही निरीक्षकाने किंवा कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये अर्ज करण्यास प्राधिकाऱ्याकडून परवानगी देण्यात आलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीने अपील दाखल केल्यानंतर, कोणत्याही वेळी त्या कलमात निर्दिष्ट करण्यात आलेल्या न्यायालयाची जर अशी खात्री पटली की, कलम १५ किंवा कलम १७ अन्वये जी रक्कम देण्याचा निदेश देण्यात आला आहे ती रक्कम देण्याचे नियोक्ता किंवा कलम ३ अन्वये वेतन प्रदानास जबाबदार असलेली अन्य व्यक्ती, चुकवण्याची शक्यता आहे तर, तो प्राधिकारी किंवा यथास्थिति, ते न्यायालय, ज्या प्रकरणा-मध्ये विलंबामुळे न्यायाची उद्दिष्टे विफल होतील असे त्याचे मत होईल तेवढी प्रकरणे वगळून एरव्ही, नियोक्त्यास किंवा त्या अन्य व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन नंतर नियोक्त्याच्या किंवा वेतन-प्रदानास जबाबदार असलेल्या त्या अन्य व्यक्तीच्या मालमत्तेपैकी जितकी मालमत्ता निदेशान्वये प्रदेय असलेली रक्कम भागविण्यास त्या प्राधिकाऱ्याच्या मते पुरेशी असेल तितकी मालमत्ता जप्त करण्याचा निदेश देऊ शकेल.

(२) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) याचे जे उपबंध त्या संहितेखालील अव्वल जप्तीशी संबंधित असतील ते, शक्य तेथवर पोटकलम (१) खालील कोणत्याही जप्ती आदेशास लागू होतील.]

कलम १५ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या प्राधि-काऱ्याच्या शक्ती.

**१८.** कलम १५ च्या पोटकलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या प्रत्येक प्राधिकाऱ्यास साक्षीपुरावा घेण्याच्या व साक्षीदारांना उपस्थित राहण्यास भाग पाडण्याच्या व दस्तऐवज सादर करण्याच्या प्रयोजनांकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) याखाली दिवाणी न्यायालयाला असलेल्या सर्व शक्ती असतील आणि असा प्रत्येक प्राधिकारी म्हणजे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याचे कलम १९५ व [4][प्रकरण २६] यांच्या सर्व प्रयोजनांकरिता दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

**१९.** विवक्षित प्रकरणी नियोक्त्याकडून वसुली करण्याची शक्ती वेतन प्रदान (विशोधन) अधि-नियम, १९६४ (१९६४ चा ५३) कलम १७ द्वारे निरसित (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

या अधिनियमा-खालील अपराधां-बद्दल शास्ती.

**२०.** (१) जी कोणी व्यक्ती रोजगारी व्यक्तीला वेतन प्रदान करण्यास जबाबदार असून, पुढील पैकी म्हणजे [5][कलम ५—त्यातील पोटकलम (४) वगळून, कलम ७, कलम ८, त्यातील पोटकलम (८) वगळून, कलम ९, कलम १० त्यातील पोटकलम (२) वगळून-आणि कलमे ११ ते १३]—दोन्ही धरून यांपैकी कोणत्याही कलमाच्या उपबंधाचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती, [6][दोनशे रुपयांपेक्षा कमी नाही परंतु, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल] इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

---

१. १९५७ चा अधिनियम ६८, कलम ७ द्वारे पोटकलम (२) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले (१ एप्रिल, १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. १९६४ चा अधिनियम ५३, कलम १५ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. १९५७ चा अधिनियम ६८, कलम ८ द्वारे दाखल करण्यात आले (१ एप्रिल, १९५८ रोजी व तेव्हापासून).

४. १९८२ चा अधिनियम ३८, कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. १९६४ चा अधिनियम ५३, कलम १८ द्वारे "कलम ५ आणि कलम ७ ते १३" या मजकुरा-ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

६. १९८२ चा अधिनियम क्र. ३८, कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

(२) जी कोणी व्यक्ती [1][कलम ५ चे पोटकलम (४), कलम ६, कलम ८ चे पोटकलम (८), कलम १० चे पोटकलम (२)] किंवा कलम २५ यांच्या उपबंधाचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती [2][पाचशे रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

[3][(३) या अधिनियमान्वये कोणतेही अभिलेख किंवा नोंदवह्या ठेवणे अथवा कोणतीही माहिती किंवा प्रतिवेदन स्वतः देणे आवश्यक असून जी कोणी व्यक्ती,—

(क) अशी नोंदवही किंवा अभिलेख ठेवण्यास चुकेल, किंवा

(ख) अशी माहिती किंवा प्रतिवेदन देण्यास बुद्धिपुरस्सर नकार देईल किंवा कायदेशीर सबबी नसताना त्या कामी हयगय करील, किंवा

(ग) एखादी माहिती किंवा प्रतिवेदन खोटे असल्याचे स्वतःला माहीत असूनही बुद्धिपुरस्सर अशी माहिती किंवा प्रतिवेदन देईल किंवा देववील, किंवा

(घ) या अधिनियमान्वये देणे आवश्यक असेल अशी कोणतीही माहिती मिळवण्याकरिता जो कोणताही प्रश्न विचारणे आवश्यक असेल अशा कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास नकार देईल किंवा त्या प्रश्नाला बुद्धिपुरस्सर खोटे उत्तर देईल,

ती व्यक्ती, अशा प्रत्येक अपराधाबद्दल [4][दोनशे रुपयांपेक्षा कमी नाही परंतु, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल] इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(४) जी कोणी व्यक्ती,—

(क) या अधिनियमान्वये आपले कर्तव्य पार पाडीत असलेल्या निरीक्षकास बुद्धिपुरस्सर अटकाव करील, किंवा

(ख) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली कोणतीही रेल्वे, कारखाना किंवा [4][औद्योगिक किंवा इतर आस्थापना] यांच्या संबंधात प्राधिकृत करण्यात आलेला कोणताही प्रवेश, पाहणी, तपासणी, देखरेख किंवा चौकशी करण्याकरिता एखादया निरीक्षकास कोणतीही वाजवी सुविधा उपलब्ध करून देण्यास नकार देईल किंवा त्याकामी बुद्धिपुरस्सर उपेक्षा करील, किंवा

(ग) या अधिनियमानुसार ठेवलेली नोंदवही किंवा इतर अभिलेख निरीक्षकाने मागणी केल्यावर हजर करण्यास बुद्धिपुरस्सर नकार देईल, किंवा

(घ) या अधिनियमान्वये आपल्या कर्तव्यानुसार वागणाऱ्या निरीक्षकापुढे हजर होण्यास किंवा त्याच्याकडून साक्षतपासणी करून घेण्यास कोणत्याही व्यक्तीस प्रतिबंध करील किंवा प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करील किंवा ज्यामुळे तसा प्रतिबंध होईल असे मानण्यास त्या व्यक्तीला कोणतेही कारण मिळेल अशी कोणतीही गोष्ट करील,

अशी व्यक्ती, [4][दोनशे रुपयांपेक्षा कमी नाही परंतु, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल] इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(५) या अधिनियमाखाली कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरवण्यात आलेली कोणतीही व्यक्ती पुन्हा त्याच उपबंधाने व्यतिक्रमण अनुसरून असणाऱ्या एखादया अपराधाबद्दल दोषी ठरल्यास, अशा नंतरच्या दोषसिद्धीअंती ती व्यक्ती [4][एक महिन्यापेक्षा कमी नाही परंतु, सहा महिन्यापर्यंत असू शकेल] इतक्या मुदतीच्या कारावासास [4][आणि पाचशे रुपयांपेक्षा कमी नाही परंतु तीन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल]:

परंतु, त्या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, ज्याबद्दल शिक्षा देण्यात येत आहे असा अपराध घडल्याचे ज्या तारखेस निरीक्षकाच्या लक्षात आले असेल त्या तारखेआधीच्या दोन वर्षापेक्षा अधिक काळापूर्वी केलेल्या कोणत्याही दोषसिद्धीची दखल घेण्यात येणार नाही.

(६) जर एखादी व्यक्ती, कोणत्याही रोजगारी व्यक्तीचे वेतन या बाबतीत प्राधिकाऱ्यांकडून निश्चित करण्यात आलेल्या तारखेपर्यंत देण्यास चुकली किंवा त्याकामी तिने बुद्धिपुरस्सर उपेक्षा केली तर, त्या व्यक्तीविरुद्ध करण्यात येईल अशा इतर कोणत्याही कारवाईस बाध न येता, ती व्यक्ती अशी कसूर करण्याचे किंवा उपेक्षा करण्याचे चालू राहील त्या प्रत्येक दिवसागणिक [4][शंभर रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या अतिरिक्त द्रव्यदंडास पात्र होईल].

---

१. १९८२ चा अधिनियम ३८, कलम १८ द्वारे "कलम ६" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**२१.** (१) कलम २० च्या पोटकलम (१) खालील अपराधाबाबत, कलम १५ अन्वये अपराधाच्या घटक तथ्यांच्या संबंधात अर्ज सादर करण्यात येऊन तो पूर्णतः किंवा अंशतः मंजूर करण्यात आला आहे किंवा नंतर उल्लेखिलेल्या कलमान्वये अधिकार प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकाऱ्याने किंवा असा अर्ज मंजूर करणाऱ्या अपील न्यायालयाने तक्रार दाखल करण्यास मंजुरी दिली आहे असे झाल्याखेरीज कोणतेही न्यायालय त्या अपराधाबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध करण्यात आलेल्या तक्रारीची दखल घेणार नाही. अपराधाच्या संपरीक्षेची कार्यपद्धती.

(२) कलम २० च्या पोटकलम (१) खालील अपराधाबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल करण्यास मंजुरी देण्यापूर्वी कलम १५ अन्वये अधिकार प्रदान करण्यात आलेला प्राधिकारी किंवा यथास्थिति, अपील न्यायालय, अशी मंजुरी देण्याविरुद्ध अशा व्यक्तीला कारण दाखविण्यासाठी संधी देईल, आणि अशा व्यक्तीने,—

(क) रोजगारी व्यक्तीला प्रदेय असणाऱ्या रकमेबाबत प्रामाणिक चूकभूल झाल्यामुळे किंवा खराखरा तंटा उद्‌भवल्यामुळे, किंवा

(ख) ज्यामुळे वेतन प्रदानास जबाबदार असलेली व्यक्ती, वाजवी तत्परता दाखवूनही वेळेवर प्रदान करण्यास असमर्थ ठरली अशा प्रकारचा आकस्मिक प्रसंग उद्‌भवल्यामुळे किंवा अशी अपवादात्मक परिस्थिती अस्तित्वात असल्यामुळे, किंवा

(ग) रोजगारी व्यक्ती प्रदानासाठी अर्ज करण्यास किंवा ते स्वीकारण्यास चुकल्यामुळे,

आपल्याकडून कसूर झाली याबद्दल प्राधिकाऱ्याची किंवा न्यायालयाची खात्री पटवून दिल्यास, तक्रार दाखल करण्यास मंजुरी देण्यात येणार नाही.

(३) या अधिनियमान्वये एखाद्या निरीक्षकाकडून किंवा त्याच्या मंजुरीने तक्रार दाखल करण्यात आली असल्याखेरीज, कोणतेही न्यायालय कलम ४ किंवा कलम ६ च्या व्यतिक्रमणाची किंवा कलम २६ खाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या व्यतिक्रमणाची दखल घेणार नाही.

[1][ **(३क)** या अधिनियमान्वये एखाद्या निरीक्षकाकडून किंवा त्याच्या मंजुरीने तक्रार दाखल करण्यात आली असल्याखेरीज कोणतेही न्यायालय कलम २० च्या पोटकलम (३) किंवा पोटकलम (४) खाली शिक्षापात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.]

(४) कलम २० च्या पोटकलम (१) खालील अपराधाबद्दल द्रव्यदंड बसविताना, न्यायालय, आरोपी व्यक्तीविरुद्ध कलम १५ अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये आधीच देववण्यात आलेल्या कोणत्याही भरपाईची रक्कम विचारात घेईल.

**२२.** वेतनाच्या किंवा वेतनातून वजात केलेल्या कोणत्याही रकमेच्या वसुलीसाठी दावा करण्यात आला असता, याप्रमाणे मागणी करण्यात आलेली कोणतीही रक्कम ही,— दाव्यांना आडकाठी.

(क) कलम १५ खाली वादीने सादर केलेला जो अर्ज त्याच कलमान्वये नियुक्त करण्यात आलेल्या प्राधिकाऱ्यापुढे प्रलंबित असेल त्या अर्जाचा विषय असेल किंवा कलम १७ खालील एखादा अपीलाचा विषय असेल; किंवा

(ख) कलम १५ अन्वये वादीच्या बाजूने देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशाचा विषय बनलेला असेल; किंवा

(ग) कलम १५ खालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये वादीस देणे नसल्याचा न्यायनिर्णय करण्यात आला असेल; किंवा

(घ) कलम १५ खालील एखाद्या अर्जाद्वारे वसूल करता आली असती अशा प्रकारची असेल,

तर (तेवढ्या मर्यादेपर्यंत), कोणतेही न्यायालय असा कोणताही दावा विचारार्थ स्वीकारणार नाही.

**२२क.** या अधिनियमाखाली सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल शासनाविरुद्ध किंवा शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.] [2][सद्‌भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

**२३.** ज्याद्वारे रोजगारी व्यक्ती, या अधिनियमाने प्रदान केलेला कोणताही हक्क सोडून देते अशी कोणतीही संविदा किंवा करार या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी करण्यात आलेला असो वा त्यानंतर करण्यात आलेला असो—त्यामध्ये त्या व्यक्तीला अशा हक्कापासून वंचित करावे, असे अभिप्रेत असेल तर (तेवढ्या मर्यादेपर्यंत) अशी संविदा किंवा करार रद्दबातल असेल. संविदेद्वारे दायित्व-मुक्त करणे.

---

१. १९६४ चा अधिनियम ५३ ,कलम १९ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमचा कलम २० द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

[1][ रेल्वे, विमान वाहतूक सेवा, खाणी व तेलक्षेत्रे यांना अधिनियम लागू असणे

२४. राज्य शासनाला या अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेली शक्ती [2][ रेल्वे ], [3][ विमान वाहतूक सेवा ], खाणी व तेलक्षेत्रे यांच्या संबंधात केंद्र सरकारला असलेल्या शक्तीप्रमाणेच असतील. ]

अधिनियमाचे गोषवारे नोटीशीद्वारे प्रदर्शित करणे.

२५. [4][ कारखान्यात किंवा औद्योगिक किंवा इतर आस्थापनांमध्ये रोजगाराला असलेल्या ] व्यक्तींना वेतन प्रदान करण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीला [4][ अशा कारखान्यात किंवा औद्योगिक किंवा इतर आस्थापनांमध्ये ] या अधिनियमातील तसेच त्याखाली करण्यात आलेल्या नियमांतील विहित करण्यात येतील असे गोषवारे इंग्रजीमधून व [4][ कारखान्यात किंवा औद्योगिक किंवा इतर आस्थापनांमध्ये ] रोजगाराला असलेल्या बहुसंख्य व्यक्तींच्या भाषेत नोटिशीद्वारे प्रदर्शित करण्याची तजवीज करावी लागेल.

[5][ रोजगाराला असलेल्या व्यक्तींच्या मृत्यू प्रकरणी संवितरीत न केलेल्या वेतनाचे प्रदान.

२५क. (१) या अधिनियमाच्या इतर उपबंधांच्या अधीनतेने रोजगाराला असलेल्या व्यक्तीला वेतन म्हणून देय असलेल्या सर्व रकमा, प्रदानाच्या पूर्वी त्याच्या मृत्यूमुळे किंवा त्याचा ठावठिकाणा माहित नसल्यामुळे अशी रक्कम दिली नाही किंवा देता आली नाही तर,—

(क) या अधिनियमान्वये केलेल्या नियमानुसार याबाबतीत त्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीला देण्यात येईल; किंवा

(ख) जेव्हा असे नामनिर्देशन केलेले नसेल किंवा कोणत्याही कारणास्तव अशा प्रकारे नामनिर्देशन केलेल्या व्यक्तीला अशा रकमा देता येत नसतील तेव्हा, अशा रकमा विहित प्राधिकाऱ्याकडे जमा करण्यात येतील, जो अशाप्रकारे जमा केलेल्या रकमांचा विहित पद्धतीनुसार व्यवहार करेल.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधानुसार जेव्हा रोजगाराला असलेल्या व्यक्तीला वेतन म्हणून देय असलेल्या सर्व रकमा,—

(क) रोजगाराला असलेल्या व्यक्तीने नामनिर्देशन केलेल्या व्यक्तीला नियोक्त्याने दिल्या आहेत; किंवा

(ख) नियोक्त्याने विहित प्राधिकाऱ्याकडे जमा केल्या आहेत.

तेव्हा नियोक्ता अशी वेतने देण्याच्या त्याच्या दायित्वातून मुक्त होईल. ]

नियम करण्याची शक्ती.

२६. (१) कलम १५ व कलम १७ मध्ये निर्दिष्ट केलेले प्राधिकारी व न्यायालये यांनी अनुसरावयाच्या कार्यपद्धतीचे विनियमन करण्यासाठी राज्य शासनास नियम करता येतील.

(२) या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनास [6]* * * **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(३) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, पोटकलम (२) खाली केलेल्या नियमांद्वारे,—

(क) या अधिनियमाच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक असतील असे अभिलेख, नोंदवह्या, प्रतिवेदने व नोटिसा राखणे आवश्यक करता येईल आणि [7][ त्यांचा नमुना व अशा नोंदवह्या किंवा अभिलेख यांत नोंदावयाचा तपशील विहित करता येईल ];

(ख) जेथे काम चालते अशा वास्तुमध्ये रोजगारावर ठेवण्यात आलेल्या व्यक्तींचे वेतन-दर विनिर्दिष्ट करणाऱ्या नोटिसा अशा वास्तुमधील ठळक ठिकाणी प्रदर्शित करणे आवश्यक करता येईल;

---

१. भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७ द्वारे मूळ कलम २४ ऐवजी दाखल करण्यात आले.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे (भारत सरकार अधिनियम, १९३५ याच्या अर्थानुसार) "फेडरल रेल्वे" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

३. १९६४ चा अधिनियम ५३, कलम २१ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९६५ रोजी व तेव्हापासून).

४. १९८२ चा अधिनियम ३८, कलम १२ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे समाविष्ट केले.

६. भारत सरकार (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७, याद्वारे विवक्षित शब्द वगळण्यात आले.

७. १९६४ चा अधिनियम ५३, कलम २२ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

(ग) आपण रोजगारावर ठेवलेल्या व्यक्तीचे वेतन पडताळण्यासाठी किंवा त्याची खातरजमा करण्यासाठी नियोक्त्यांकडून वापरण्यात येणारी वजने, मापे व वजन करावयाची यंत्रे यांची नियमित पाहणी व्हावी अशी व्यवस्था करणे;

(घ) कोणकोणत्या दिवशी वेतन देण्यात येईल त्यासंबंधीची नोटीस देण्याची पद्धती विहित करता येईल;

(ङ) कोणत्या कृतींच्या व अकृतींच्या बाबतीत द्रव्यदंड बसवता येईल त्यासंबंधी कलम ८ च्या पोटकलम (१) खाली मान्यता देण्यास सक्षम असलेला प्राधिकारी विहित करता येईल;

(च) कलम ८ अन्वये द्रव्यदंड बसविण्यासाठी व कलम १० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वजाती करण्यासाठी कार्यपद्धती विहित करता येईल;

(छ) कलम ९ पोट-कलम (२) च्या परंतुकान्वये कोणत्या शर्तींच्या अन्वये वजाती कराव्या ते विहित करता येईल;

(ज) द्रव्यदंडापासून मिळालेले उत्पन्न कोणत्या प्रयोजनांकरिता खर्च करावे त्यासंबंधी मान्यता देण्यास सक्षम असणारा प्राधिकारी विहित करता येईल;

(झ) कलम १२ च्या खंड (ख्) च्या संदर्भात, किती मर्यादेपर्यंत अग्रिमे द्यावीत व ती किती हप्त्यांमध्ये वसूल करावीत हे विहित करता येईल,

[१][(झक) कलम १२क च्या संदर्भात, किती मर्यादेपर्यंतच्या रकमेची कर्जे मंजूर करावी व त्यावरील व्याजाचा दर काय असावा ते विहित करता येईल;

(झख) या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता निरीक्षकांच्या शक्ती विहित करता येतील],

(ञ) या अधिनियमाखालील कार्यवाहीमध्ये जो दावाखर्च मंजूर करावयाचा त्याचे प्रमाण विनियमित करता येईल;

(ट) या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात प्रदेय असेल अशी न्यायालयाची रक्कम विहित करता येईल ; [२]* * * *

(ठ) कलम २५ अन्वये आवश्यक असतील त्याप्रमाणे नोटिशीमध्ये समाविष्ट करावयाचे गोषवारे विहित करता येतील;

[३]* * * *

[४][(ठक) कलम २५क च्या पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ नामनिर्देशन ज्या नमुन्यात करता येईल तो नमुना व पद्धत, कोणतेही असे नामनिर्देशन रद्द करणे किंवा त्यात बदल करणे किंवा नामनिर्देशित व्यक्ती आधीच मृत्यू पावली असे घडल्यास, कोणतेही नवीन नामनिर्देशन करणे आणि अशा नामनिर्देशनाशी संबंधित बाबी विहित करता येतील;

(ठख) कलम २५क, पोटकलम (१) खंड (ख) अन्वये ज्या प्राधिकाऱ्याकडे रकमा जमा करणे आवश्यक आहे ते प्राधिकारी आणि त्या खंडाअन्वये अशा प्राधिकाऱ्याकडे जमा केलेल्या रकमांचा ज्या पद्धतीने व्यवहार करता येईल ती पद्धत विनिर्दिष्ट करता येईल ; ]

[५][(ड) विहित करावयाच्या किंवा विहित करता येईल अशा इतर कोणत्याही बाबीसंबंधी तरतूद करता येईल.]

(४) या कलमाखाली कोणताही नियम करताना, राज्य शासनाला असा उपबंध करता येईल की, त्या नियमाचे व्यतिक्रमण केल्यास तो अपराध, दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(५) या कलमाखाली केलेले सर्व नियम हे पूर्वप्रकाशनाच्या शर्तीस अधीन असतील, आणि सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) कलम २३ खंड (३) अन्वये विनिर्दिष्ट करावयाची तारीख ही, प्रस्तावित नियमांचा मसुदा प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आतील असणार नाही.

---

१. १९६४ चा अधिनियम ५३, कलम २२ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे "आणि" हा शब्द वगळण्यात आला (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे समाविष्ट करण्यात आलेला "आणि" हा शब्द, १९८२ चा अधिनियम ३८, कलम १४ द्वारे वगळण्यात आला.

४. १९८२ चा अधिनियम ३८, कलम १४ द्वारे समाविष्ट केले.

५. १९६४ चा अधिनियम ५३, कलम २२ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

[1][ (६) केंद्र सरकारने या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा [2][दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे] मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि [2][पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र] संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा प्रकरणपरत्वे मुळीच परिणामक होणार नाही तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

---

१. १९६४ चा अधिनियम ५३, कलम २२ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. १९८२ चा अधिनियम ३८, कलम १४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

सुभाष सी. जैन,
सचिव, भारत सरकार.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.